रिक हॅन्सेन

व्हीलचेयरवर जगप्रवास

लेखिका: ऐन्स्लि मॅन्सन चित्रे: रॉन लाईटबर्न



रिक हॅन्सेनने आपल्या अविश्वसनीय *मॅन इन मोशन वर्ल्ड टूर* या मोहिमेद्वारे संपूर्ण जगाचा प्रवास व्हीलचेयरवरून केला. त्याने जगभरातील मुलांना मोठी, अशक्यप्राय वाटणारी स्वप्नं पाहाण्याची प्रेरणा दिली. चीनमध्ये रिकला *लीन* भेटली. तिला बॅले नृत्यांगना बनायचं होतं. रिकला भेटल्यावर, आपण चीनच्या महाकाय भिंतीइतक्याच उंच भिंतीवर प्रसन्नपणे उड्या मारत आहोत, असं स्वप्न ती बघू लागली. कॅनडात जॅकने व्हीलचेयरवर खूप प्रगती केली - इतकी की तो *व्हीली* नावाची कसरतही करायलाही शिकला. जॅक आपल्या हिरोच्या परतीची आतुरतेने वाट पाहात होता.

वाटेत रिकने अनेक आनंदी अनुभव घेतले. पण त्याला बऱ्याच वेदना, घरची ओढ आणि फ्लूचा आजार या गोष्टीही सहन कराव्या लागल्या. त्याने दिवसाला तीन मॅरेथॉनइतकं अंतर व्हीलचेयर चालवली. त्याच्या हातमोज्यांचे 94 जोडे फाटले, व्हीलचेयरची 160 चाकं फाटली. प्रवासादरम्यान त्याने आपले दोन वाढदिवस साजरे केले. शेवटी, दोन वर्षांपेक्षा जास्त काळ प्रवास करून, रिक हॅन्सेन विजयी होऊन घरी परतला. त्याने आपलं स्वप्न साकार केलं.



रिक हॅन्सेन

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन

रिक हॅन्सेन जॅकला भेटायला हॉस्पीटलमध्ये आला तेव्हा *जॅक* रोमांचित झाला. रिक हा जॅकचा हीरो होता. रिक जॅकपेक्षा वयाने थोडासा मोठा होता, तेव्हा त्याला कुणीतरी ट्रकच्या मागे फेकलं होतं. पण त्याच्या जखमा त्याला थांबवू शकल्या नाहीत. लवकरच तो व्हीलचेयर बास्केटबॉल खेळू लागला, व्हीलचेयर मॅरेथॉन शर्यतीत सहभागी झाला.



रिकने बिछान्याच्या शेजारीच एक व्हिली कसरत करून जॅकला हसवलं.

“पुढे बघायला शिक, मागे नाही,” रिकने जॅकला सांगितलं. “उठ आणि व्हीलचेयर चालवायला सुरुवात कर.”

जॅकने त्याच्या म्हणण्यानुसार केलं.



व्हँकुवर, कॅनडा. मार्च 21, 1985.

आज जॅकचा हीरो एक नव्या आव्हानाला सामोरा जाणार होता. रिक व्हीलचेयरवरून साऱ्या जगाची सफर करणार होता.

“चला,” जॅकने त्याच्या बहिणींना म्हटलं. “आम्हाला उशीर करायचा नाहीये. रिक हॅन्सेनची जगप्रवासाची *मॅन इन मोशन वर्ल्ड टूर* सुरू होण्याच्या बेतात आहे.”



जॅकला आपल्या जागेवरून समोरचं दृश्य स्पष्ट दिसत होतं. तेवढ्यात एक बलदंड माणूस मोठा कॅमेरा घेऊन त्याच्यासमोर येऊन उभा राहिला.

“तुम्ही मध्ये उभं राहिल्यामुळे मला काही दिसत नाहीये,” जॅक म्हणाला. जॅक त्याला हलकेच कोपराने ढोसणार होता. पण तेव्हाच त्या माणसाला मागून कुणाचातरी धक्का लागला.

“अरे,” हातातून खाली पडणारा कॅमेरा सावरत तो माणूस म्हणाला, “मला वृत्तपत्रासाठी फोटो घ्यायचे आहेत!”

“पण मला रिक दिसत नाहीये,” जॅकने तक्रार केली.

जॅक डावीकडे वळला, उजवीकडे वळला. शेवटी, त्याला थोडीशी खुली जागा मिळाली आणि त्यातून त्याला रिक दिसला.

“प्रवासाला शुभेच्छा!” जॅक ओरडला.

रिकने पुढील दोन वर्ष दिवसाला साठ ते सत्तर किलोमीटर प्रवास करायचा, असं ठरवलं होतं. जॅक त्याला निरोप द्यायला गेला पण आपल्या व्हीलचेयरवरून थोडंसं पुढे गेल्यावर तो दमला.





चाकं फिरवा, व्हीलचेयर चालवा
जोर लावा, जोर लावा,
पहिली सीमा पार करा,
आणि साऱ्या अमेरिकेला चक्कर मारा.

रिकचे खांदे दुखू लागले, हातांना फोड आले. त्याने व्हीलचेयर डोंगरांवर चढवत नेली, वाळवंटात चालवली. रस्ता नेहमी लांबलचक आणि एकाकी भासत असे. पण तो फ्लोरिडाच्या किनारी पोहोचला तेव्हा त्याने तिथे काही मुलांना पाहिलं.

*बेथ*चा मित्र *सँडी*ने तिच्या हातावर थोपटलं आणि इशारा केला.

"बघ, आलाच तो!" बेथ म्हणाली.

रिकसारखंच, सँडीसुद्धा दिव्यांग होता. त्याला कमरेच्या खाली अर्धांगवायू झाला होता. पण सँडीला बोलायचाही त्रास होता.

सँडीने रिकला त्याने काढलेलं चित्र दिलं. रिक अंतिमरेषा पार करत आहे, असं ते चित्र होतं.

"तू निष्णांत चित्रकार आहेस," रिक म्हणाला.

"तो सर्वोत्तम आहे," बाथ म्हणाली. पण बाथला माहीत होतं की सँडी शाळेत चित्रकला शिकू शकत नव्हता. कारण त्यांचा चित्रकलेचा वर्ग तिसऱ्या मजल्यावर होता. बेथला एक कल्पना सुचली. चित्रकलेचा वर्ग तळमजल्यावर आणला तर! तिने यावर दुपारी प्रिन्सिपलशी बोलायचं ठरवलं.

चाकं फिरवा, व्हीलचेयर चालवा

जोर लावा, जोर लावा,

आयर्लंड, स्कॉटलंड, इंग्लंड

रिकला फ्लू झाला होता, शिवाय त्याने चुकीचं वळण घेतलं होतं. मागून एक बस सारखा हॉर्न वाजवत होती. त्याला आपल्या वाटेतून दूर हो म्हणत होती.

दोन मुली त्या बसमधून उतरल्या, थेट रिक हॅन्सेनच्या समोर.

"आज आम्ही शाळेत तुमच्याबद्दल ऐकलं," *हॅना* म्हणाली.

"आणि आता तुम्ही चक्क भेटताय मला," रिक म्हणाला, "लंडनमध्ये हरवलेल्या या रिकला."

"मी तुम्हाला मदत मिळवून देते," *हॉली* म्हणाली.

हॅनाने रिककडे न पाहायचा प्रयत्न केला. रिक भयानक दिसत होता. "तुम्ही कॅनडातून इथवर आलात, व्हीलचेयर चालवत?"

"समुद्र पार नाही केला," रिक म्हणाला. "माझ्या व्हीलचेयरला पंख नाहीत!"

"पण तुम्ही खूप थकलेले दिसताय. तुम्हाला बरं वाटत नाहीये का?"

रिकने मान हलवली.

"काय पाहिजे तुम्हाला, लेमन ड्रॉप की माझा स्वच्छ रुमाल?"

रिक उत्तर देण्याआधीच हॉली परतली. "तुम्हाला वाट दाखवण्यासाठी इंग्लंडची महाराणी आपल्या मोटरसायकल एस्कॉर्टला पाठवतायत."

"बघा, आलेच ते!" हॅना म्हणाली.

"तुम्ही मुली विलक्षण आहात," रिक म्हणाला. "मला बरं वाटतंय आता."

"त्यांचा चेहरा पडलेला दिसतोय," रिक निरोपादाखल हात हलवत दूर गेला तेव्हा हॉली म्हणाली.

"प्रसिद्ध लोकांनाही फ्लू होतो," हॅना म्हणाली.





चाकं फिरवा, व्हीलचेयर चालवा

जोर लावा, जोर लावा,

फ्रान्स, बेल्जियम, हॉलंड, जर्मनी, डेन्मार्क

नॉर्वे, स्वीडन, फिनलंड, रशिया आणि पोलंड

रिकने त्याच्या समस्यांकडे दुर्लक्ष करायचा प्रयत्न केला. त्याने फक्त त्या दिवशी येणाऱ्या समस्येचा विचार करायचं ठरवलं. त्याला टीमचे सदस्य, मोटारघर आणि त्याची खुर्ची यांच्या काही समस्या जाणवल्या. आणि आता – त्याला धुराचा वास येता होता का? कुणी ओरडत होतं का?

"आग! मदत करा!" *पॅट्रीक* पोलीश भाषेत ओरडू लागला. तो रिक हॅन्सनची एक झलक बघण्यासाठी मोटारघराच्या मागे गेला होता. पण तिथे त्याला एका खिडकीतून खूप धूर येताना दिसला.

टीमचे दोन सदस्य लगेच मोटारघरात शिरले, त्यांनी रिकला बाहेर काढलं आणि ते पुन्हा आत शिरले.

पॅट्रीकने पाहिलं की रिकला इतक्या घाईघाईत बाहेर काढलं की त्याला आपली पॅंट वर घेण्याचीही उसंत मिळाली नाही. रिकलाही हे उमगलं. मग ते दोघं मोठमोठ्याने हसू लागले.

परिस्थिती ओटाक्यात आली तसा पॅट्रीक आत गेला आणि रिकची पॅंट आणि व्हीलचेयर घेऊन आला.

"तुझ्या मदतीसाठी आभार," रिक म्हणाला.

पॅट्रिकला त्याचे इंग्रजी शब्द कळले नाहीत. पण रिकच्या चेहऱ्यावरचे भाव आणि हस्तांदोलन यांनी त्याला सगळं सांगितलं.

त्या रात्री रिकच्या सन्मानार्थ एक विशेष छोटेखानी समारंभ आयोजित केला गेला. पॅट्रिक तयार होण्यासाठी घरी गेला.



चाकं फिरवा, व्हीलचेयर चालवा

जोर लावा, जोर लावा,

झेक रिपब्लिक, ऑस्ट्रिया, स्वित्झर्लंड,

स्पेन, पोर्तुगाल, मोरोक्को आणि इटली

इटलीची सीमा पार करेपर्यंत रिक पूर्ण थकून गेला. पण बिछान्यात पडायला मध्यरात्र झाली असती आणि पुन्हा सकाळी 5:30 वाजता उठायचं होतं. त्याची टीम कुरकुर करत होती, विशेषत: ज्यांना कपडे धुवायचं काम दिलं होतं, ते दोघं!

मात्teओ आपल्या आजीचे कपडे धुवायला लाँड्रोमॅटमध्ये (सार्वजनिक वॉशिंगमशीन) आला होता. त्याच्यासोबत त्याची चुलत बहीण *गियाना*सुद्धा होती. ती कॅनडाहून आली होती आणि अंध होती.

दोघंजण ड्रायरमधून वाळलेले कपडे काढत इंग्रजीतून चेष्टामस्करी करत होते.

"तुम्ही व्हीलचेयरवर जागतिक प्रवास करताय ना," गियाना म्हणाली.

मात्टेओ घाबराघुबरा होऊन पाहू लागला. कारण ती त्यांच्या कपड्यांवर बसली होती! एक टी शर्ट तिच्या पायाला चिकटला होता.

"बापरे!" गियाना म्हणाली, "किती चिकट आहे!"

"आम्ही रिकच्या मोज्यांना डांबर लावतो. त्यामुळे त्यांची पकड घट्ट होते," एकजण म्हणाला. "ते डांबर चिकटतं सगळ्याला."

"त्याला बर्फाने स्वच्छ करायचा प्रयत्न करा," गियाना म्हणाली.


"चांगली कल्पना आहे," दुसरा माणूस म्हणाला. "आम्ही करू."

दोघं निघून गेले. गियाना मात्टेओला रिकबद्दल सांगू लागली.

"त्याला दिव्यांग लोकांचं आयुष्य सोपं करायचंय."

"त्यांच्या कपड्यांवर बसणाऱ्या लोकांचंसुद्धा?" मात्टेओने तिला चिडवलं.

गियाना हसू लागली. "हो तर!"





चाकं फिरवा, व्हीलचेयर चालवा

जोर लावा, जोर लावा,

सर्बिया, क्रोएशिया, ग्रीस, बॅहरीन

मग जॉर्डन आणि इस्रायल

रिकने व्हीलचेयर पुलावर नेली. पूल लहान होता, पण सुरक्षित होता. इस्रायल आणि जॉर्डन यांना जोडणारा तो एकमेव रस्ता होता. पुलाच्या मध्यावर चार मित्र त्याच्याशी गप्पा मारायला त्याची वाट बघत उभे होते.



हेस्सा आणि *आदिवा* जॉर्डनमधून आले होते. *लेवी* आणि *एली* इस्रायलमधून आले होते. त्यांचे देश एकमेकांचे शत्रू होते.

"आला बघ तो!" हेस्सा म्हणाली.

"तुम्ही चौघं टीमचे सदस्य आहात?" रिकने सर्वांशी हात मिळवत विचारलं.

"एका तऱ्हेने होय," एली म्हणाली. "आम्ही दोन देशांतल्या मुलांच्या एका मैत्री क्लबचे सदस्य आहोत."

"एकमेकांसोबत काम करणं नेहमीच सोपं नसतं," आदिवा म्हणाला.

"खरंय तुमचं म्हणणं," रिक म्हणाला. "मला वाटतं तुम्ही एकमेकांची बाजू नक्की ऐकली पाहिजे."

"आम्ही ऐकतो," लेवी म्हणाला. "तोच तर एक चांगला मार्ग आहे."

चाकं फिरवा, व्हीलचेयर चालवा

जोर लावा, जोर लावा,

न्यूझीलंड

त्यांच्याकडे ख्रिसमस वृक्षाच्या रुपात एक छोटंसं रोपटं होतं. तरीही रिकला घरची आठवण सतावत होती. ख्रिसमस संपल्यावर त्याला बरं वाटलं. कारण आता तो पुन्हा आपला प्रवास करू शकणार होता.



रोवन आणि *कोन्नोर* तयार होऊन रिकची वाट बघत होते. जेव्हा त्यांना रिक आणि त्याचा मित्र व्हीलचेयरवर बसून येताना दिसले तेव्हा ते दोघं झुडपांतून वेगाने बाहेर आले.

“आम्ही तुमच्या टीममध्ये येऊ शकतो का?” कोन्नोरने विचारलं.

रिक हसला. “चला,” तो म्हणाला.

मुलांनी रिकला सांगितलं की त्याच्यामुळेच ते व्हीलचेयर शर्यतीत सामील झाले आणि त्याचं प्रशिक्षण घेऊ लागले.

रिकने त्यांना त्याने भेट दिलेल्या देशांबद्दल, तिथल्या लोकांच्या आपुलकीबद्दल सांगितलं. “पण बऱ्याच ठिकाणी,” तो म्हणाला, “अजूनही बरंच काही करावं लागेल ज्यामुळे लोक व्हीलचेयरवर सहजपणे फिरू शकतील.”

“जसं कित्येक इमारतींमध्ये सरकते जिने असायला हवेत,” रोवन म्हणाला.

“अगदी बरोबर,” रिक म्हणाला.



चाकं फिरवा, व्हीलचेयर चालवा

जोर लावा, जोर लावा,

ऑस्ट्रेलियाकडे

आतापर्यंत रिकने निम्मं जग पालथं घातलं होतं. उरलेलं निम्मं फिरायला तो सज्ज होता. पण त्याआधी, त्याला काही प्रश्नांची उत्तरं मिळवायची होती.

शाळेची काही मुलं त्याला भेटायला गोळा झाली होती.

“आज,” रिकने त्यांना सांगितलं, “आमच्या टीमच्या एका सदस्याने निम्मा जगप्रवास पूर्ण केला म्हणून हायवेवर क्रिमची रेषा काढली.” मग रिकने ती रेषा लगेच पार केली.”



“व्वा!” एक मुलगा ओरडला.

मुलं हसू लागली.

“व्हीलचेयर रस्त्यावर चालवताना तुम्हाला एकाकी वाटत नाही का?” एका मुलीने विचारलं.

रिकने आपल्या टीमकडे बोट दाखवलं. “ते नेहमी माझ्यासोबत असतात. बऱ्याचदा ते माझ्यासोबत पायी चालतात किंवा सायकल चालवतात. मोटारघरसुद्धा थेट माझ्या मागेच असतं.”

“तुम्हाला भीती नाही वाटत गाडीखाली यायची?” दुसऱ्या मुलाने विचारलं.

“कधीच नाही,” रिक म्हणाला. “ते खूप काळजी घेतात.” “

“तुम्हाला हा प्रवास थांबवावसं वाटलं का कधी?”

“नाही,” रिक म्हणाला. “पण काही वेळा मला इजा झाल्यावर, थकल्यावर, खचल्यावर मी व्हीलचेयर चालवून माझी चिडचिड कमी करतो. त्यामुळे ती चिडचिड माझ्या टीम सदस्यांवर निघत नाही.”

“तुम्ही आता घरी जाणार का?” एका छोट्या मुलीने विचारलं.

“आत्ता नाही,” रिक म्हणाला. “पण निम्म्या रस्त्यावर आलोय घराच्या!”



चाकं फिरवा, व्हीलचेयर चालवा

जोर लावा, जोर लावा,

हाँगकाँग आणि चीनकडे

हाच तो दिवस ज्याची रिक आतुरतेने वाट पाहात होता. चीनची महाकाय भिंत चढून जाणं, हे महाकठीण काम होतं. पण त्याने ते आव्हान स्वीकारलं नाही तर त्याची मोहीम पूर्ण होणार नव्हती. भिंतीच्या शिखरावर उभी असलेली एक छोटी मुलगी त्याच्याकडे बघत होती.

शिखरावर पोहोचल्यावर रिकचं अभिनंदन करण्यासाठी लीनची निवड करण्यात आली होती. लीनने रिकचं हे यश सर्वांना गरम चहा देऊन साजरा केलं.



एका दुभाषाच्या माध्यमातून रिकने लीनचा लाल पोशाख आवडल्याचं तिला सांगितलं. तो असंही म्हणाला, “आयुष्यात अशी कोणतीही भिंत नाही जी आपण पार करू शकत नाही. मनावर घेतलं तर आपण काहीही करू शकतो.”

लीनला बॅले नर्तकी बनायचं होतं. पण तिला बाहेर जाऊन खेळावसं वाटे तेव्हा बॅलेचा सराव करणं तिच्यासाठी खूप कठीण होतं.

रिकने व्हीलचेयरचा प्रवास सुरू ठेवला. लीनने कल्पना केली की ती चीनच्या महाकाय भिंतीइतकी उंच उडी मारत आहे.



चाकं फिरवा, व्हीलचेयर चालवा

जोर लावा, जोर लावा,

कोरिया, जपान, अमेरिकेची संयुक्त संस्थाने

मग कॅनडात घराकडे

न्यू फाउंडलंडमधला *केप स्पिअर* भाग! रिकला अजून संपूर्ण देश पालथा घालायचा होता. पण तो कॅनडात परतला होता त्यामुळे त्याच्या चेहऱ्यावर हसू उमटलं. तो पश्चिम दिशेत जाऊ लागला. एक मुलगी त्याच्या मागे सायकल चालवत होती.

टीमच्या एका सदस्याशी बोलायला *लेस्ली* सायकलरून खाली उतरली. “माफ करा,” ती म्हणाली. “रिक इतक्या लवकर गेला की लोकांना हे कळलंच नाही की तो पाठीच्या कण्याच्या संशोधनासाठी देणग्या गोळा करतोय. मी त्यासाठी काही मदत करू शकते.”

पुढच्या दिवशी, लेस्ली आपल्या सायकलवर आईस्क्रिमच्या दोन रिकाम्या बादल्या आणि एक दानपात्र घेऊन आली.

तिने मोटारघराच्या खिडकीवर टकटक केलं. “कृपया, तुम्ही हे घेऊन जाल का? हे टनभर तरी जड आहे!”

तिची पिशवी पैशाने भरली होती. बादल्या इतक्या लवकर भरल्या की त्या सतत रिकाम्या कराव्या लागत होत्या. दिवसभरात, तिने जवळजवळ पाच हजार डॉलर रक्कम जमवली.

“लेस्ली!” रिक म्हणाला. “माझ्या वाढदिवसाच्या पार्टीला नक्की ये.”

पार्टीत न्यूफाउंडलंडच्या लोकांनी टेबलवर भरपूर चविष्ट पदार्थ सजवले होते. त्यात वाढदिवसाचे सात केकसुद्धा होते. लेस्लीने पोटभर खाल्लं.



चाकं फिरवा, व्हीलचेयर चालवा

जोर लावा, जोर लावा,

दहा राज्यांचा प्रवास

रिकने एव्हाना तीन-चतुर्थांश जग पालथं घातलं होतं. पण त्याला माहीत होतं की सर्वात कठीण प्रवास अद्याप शिल्लक आहे. आता तो आराम करू शकणार नव्हता, मिनिटभरसुद्धा!

वाटेतल्या प्रत्येकाला रिकबद्दल माहीत होतं.

कॅनडाचे लोक रिकचे मातृभूमीत स्वागत करत होते, त्याचा जयघोष करत होते.

प्रत्येक शहरात त्याचं एखाद्या रॉक स्टारसारखं स्वागत झालं.

पानगळ सुरू झाली होती. रिक *क्युबेक* राज्यातल्या सुंदर रंगीत झाडांखालून व्हीलचेयर चालवत होता.

ओन्टारियो राज्यात पंतप्रधानांनी त्याला बक्षीसाचा एक दशलक्ष डॉलरचा चेक दिला.

ऐन हिवाळ्यात रिक प्रेअरी प्रदेशात पोहोचला. त्याने संगणकीय कपडे घातले होते जे खास त्याच्यासाठी बनवण्यात आले होते. त्याचं शरीर खूप थंड झालं की त्या कपड्यांतले सेन्सर इशारा देत आणि कपडे अंगावर चढवण्याची सूचना करत.

अल्बर्टा राज्यात, फर्स्ट नेशन समाजाच्या वृद्ध लोकांनी रिकला गरुडाचं एक पीस दिलं. “ताकदीसाठी,” ते म्हणाले, “आणि डोंगरांमधून प्रवास करण्याचं, घरी परतण्याचं सामर्थ्य मिळण्यासाठी.”



चाकं फिरवा, व्हीलचेयर चालवा

जोर लावा, जोर लावा,

अखेरीस ब्रिटीश कोलंबियात परत!

रिक सीमेवर पोहोचला तेव्हा त्याच्या आईने त्याला आलिंगन देऊन अभिनंदन केलं. “घरी स्वागत आहे, मुला,” ती म्हणाली. काही क्षण रिक आपला थकवा, दु:ख विसरून गेला. तो आता स्वगृही परतला होता.

व्हँकुवर शहरात असलेल्या सीमारेषेकडे रिक पोहोचू लागला तसा जॅकचा उत्साह वाढू लागला. शेकडो मुलं रिकसाठी निधी उभा करत होते. हा निधी पाठीच्या कण्याचं संशोधऩ आणि व्हीलचेयर खेळांसाठी वापरण्यात येणार होता. एका मुलीने आपल्या घरामागच्या अंगणात *स्लाइड-अ-थॉन* खेळ आयोजित केला होता. कितीतरी वेळ तिने घसरण्याची मौज घेतली. मग चक्कर आल्यावर तिला खेळ थांबवावा लागला.

जॅकचा शेजारी *मॉली*ही रिकला नेहमीच मदत करत असे. ती रिकच्या *मॅन इन मोशन* मोहिमेच्या कॅनडातल्या गटाची स्वयंसेवक होती.

“हे कठीण काम आहे, पण मला ते खूप आवडतं!” ती जॅकला म्हणाली. “आपण निधी उभारतोय, प्रवासाची व्यवस्था करतोय, जगभरात साधनं पाठवतोय. हा प्रवास संपला तरी अजून बरंच काही करायचं बाकी आहे.”

जॅकने रिकला निरोप दिला त्या क्षणापासून तो विचार करत होता की तो स्वत: रिकला कशी मदत करू शकतो. आता त्याला त्याच्या या प्रश्नाचं उत्तर मिळालं!



व्हँकुवर, 23 मे 1987

पन्नास हजार लोक मॅन इन मोशन वर्ल्ड टूर साठी आयोजित केलेल्या स्वागत समारंभाला उपस्थित राहिले. व्हीलचेयरवरच्या शेकडो इतर लोकांसोबत जॅकला पहिल्या रांगेत स्थान देण्यात आलं.



कॅनडाच्या व्हीलचेयर खेळाडुंच्या सन्मान रक्षकांसोबत रिकने स्टेडियमला फेरी मारली. त्याने चाळीस हजार किलोमीटरपेक्षा जास्त अंतर कापून चौतीस देशांचा प्रवास केला होता आणि आता तर तो अंतिम रेषा पार करत होता. टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटाने गर्दीमध्ये एक जादुई लहर पसरली.

रिकच्या चेहऱ्यावर स्मित पसरलं. त्याने मोहीम फत्ते केली होती.

कार्यक्रम संपल्यावर, रिक निघाला तेव्हा जॅकने त्याला व्हीलचेयरची एक कसरत दाखवली. आपल्या कौशल्याने खरंतर जॅक स्वत:सुद्धा चकीत झाला.

“खूप छान!” रिक म्हणाला. “तू मोठीच मजल मारलीस, जॅक.”

“तुमच्याइतकं छान नाही, रिक!” जॅक हसून म्हणाला. “आता मी इथल्या गटासोबत स्वयंसेवक म्हणून काम करतोय!”

“खरंच?” रिक म्हणाला. “व्वा! मी तुला तिथेच भेटेन.”

जॅक स्टेडियम सोडून अफाट गर्दीत मिसळला. प्रत्येकजण हसत होता. रिकला हीरो मानणारा जॅक काही एकटाच नव्हता.

मॅन इन मोशन वर्ल्ड टूरने सिद्ध केलं की दिव्यांग लोक अविश्वसनीय गोष्टी करू शकतात. ते अत्यंत कठीण वाटणारं लक्ष्य गाठू शकतात. जॅकला जाणीव होती की रिकसाठी हा शेवट नाही. ही तर फक्त सुरुवात आहे.



प्रेरणादायी मित्र

रिक आणि टेरी फॉक्स एकत्र व्हीलचेयर बास्केटबॉल खेळले आणि मित्र बनले. क्रॉस-कॅनडा मॅरेथॉन ऑफ होपद्वारे कॅन्सर संशोधनासाठी जागृती केल्यावर आणि निधी जमवल्यावर 1981 साली टेरीचा मृत्यू झाला. त्याच्या मैत्रीने आणि शौर्याने रिकला मॅन इन मोशन वर्ल्ड टूरमध्ये सहभागी होण्याची प्रेरणा दिली.

रिकने मोटारघरात टेरीची छोटीशी मूर्ती ठेवली होती. जेव्हा त्याचं मन हार मानत असे तेव्हा तो त्या मूर्तीकडे पाहात असे आणि स्वत:ला आठवण करून देत असे की टेरीने कधीही हार मानली नव्हती. मग तो पुन्हा रस्त्यावर येऊन आपल्या व्हीलचेयरला जोर लावून थोडं थोडं पुढे ढकलत नेत असे.

स्फूर्तीगीत

प्रवासाच्या आरंभी, रिकला एक वेगळीच भेटवस्तू मिळाली – एक गीत! रिकचा व्हीलचेयरचा व्हिडिओ बघून एका गीतकाराला प्रेरणा मिळाली होती. हे खरंतर एका सिनेमाचं थीमगीत होतं. पण नंतर ते मॅन इन मोशन वर्ल्ड टूर मोहिमेचं अधिकृत गीत बनलं.

रिक आणि त्याची टीम हे गीत बऱ्याचदा गात. त्यामुळे त्यांना स्फूर्ती मिळे, उत्तेजन मिळे. गीताचं संगीत आकर्षक होतं. थोड्याच काळात ते जगभर लोकप्रिय झालं.

पुढे पुढे जात जगभर फिरायला

मला फक्त एक जोडी चाकांची गरज आहे.

इतर काही

मॅन इन मोशन वर्ल्ड टूरदरम्यान:

- रिकने 2 वाढदिवस साजरे केले (28 वा आणि 29 वा)
- 4 वेळा लुटमार झाली (त्यांचा छडा लागला नाही!)
- मोज्यांच्या 94 जोड्या झिजून गेल्या.
- मोटारघराचे 126 टायर पंक्चर झाले.
- व्हीलचेयरचे 160 टायर बदलण्यात आले.
- लॉन्ड्रोमॅटमध्ये 730 खेपा झाल्या.
- 2,172 पत्रे लिहिली गेली.
- 40,075 किलोमीटर एवढा प्रवास झाला.
- आणि रिकने एक कोटी वेळा हातांची हालचाल केली!

फिजिओथेरपी

रिक हॉस्पीटलमध्ये होता तेव्हा फिजिओथेरपिस्टने त्याला व्यायाम शिकवला, त्याला उठायला आणि व्हीलचेयर चालवायलाही मदत केली. जगप्रवासावेळी, रिकने इतकी अंगमेहनत केली की त्याचे स्नायू आणि सांधे निरोगी ठेवण्यासाठी त्याला दिवसातून तीनवेळा फिजिओथेरपीची गरज लागत असे.

अमांडा रीड ही रिकची फिजिओथेरपिस्ट होती. घरी परतताना, *न्यू ब्रुन्सविक* राज्यात, अमांडा आणि रिक यांचा साखरपुडा झाला. जगप्रवास संपल्यावर त्यांनी लग्न केलं. ते *रिचमंड* शहरात राहात आणि त्यांना तीन मुली झाल्या.

निधी उभारणी

रिकच्या मॅन इन मोशन वर्ल्ड टूरने 34 देशांत प्रवास केला. या प्रवासाला 2 वर्षे, 2 महिने आणि 2 दिवस लागले. या मोहिमेने दिव्यांग लोक काय करू शकतात, याबद्दल जागृती निर्माण केली. या मोहिमेने पाठीच्या कण्याच्या कॅन्सरचं संशोधन, पुनर्वसन आणि व्हीलचेयर खेळ यांसाठी 26 दशलक्ष डॉलरपेक्षा जास्त निधी जमवला.

प्रिय वाचकहो,

मी तरूण होतो तेव्हा मी एक मौल्यवान धडा शिकलो – तुमच्यासोबत काय झालं हे महत्त्वाचं नाही, पण तुम्ही त्यातून काय शिकता, काय करता ते महत्वाचं आहे. वयाच्या पंधराव्या वर्षी पाठीच्या कण्याला इजा झाल्यावर मी उध्वस्त झालो. मी माझ्या पायांचा वापर अजिबात करू शकत नव्हतो. आजुबाजुच्या लोकांनी पाठिंबा दिल्यावर, मी पुन्हा नव्याने माझं लक्ष्य निश्चित केलं. मला जाणवलं की आपलं स्वप्नं सत्यात उतरवण्यात मोठा अडथळा माझा दृष्टिकोनच होता.

हे उमगल्यावर मला खेळांकडे परतायला आणि माझं स्वप्न साकार करायला मदत मिळाली. शेवटी मी मॅन इन मोशन वर्ल्ड टूर दरम्यान माझी व्हीलचेयर जगभर चालवली. मी जगात एक बदल आणू इच्छित होतो. स्वत:वर विश्वास ठेवल्यावर आणि धैर्य एकवटल्यावर हे साध्य होऊ शकलं.

आता तुमची पाळी आहे. तुम्ही उद्याचे नेता आहात – तुम्ही बदल घडवू शकता. मी तुमच्या प्रत्येकाला तुमच्या आयुष्यात बदल घडवण्यासाठी आणि सर्वोत्कृष्ट बनण्यासाठी प्रोत्साहन देऊ इच्छितो. प्रयत्न केलात तर तुम्ही निश्चित यशस्वी व्हाल. मला आशा आहे की माझी कहाणी तुम्हाला तुमची स्वप्नं जगायला प्रेरणा देईल. माझी श्रद्धा आहे की जर आपण एखादा छोटासा बदल घडवू शकलो तर आपण एकत्र मिळून मोठा बदलही घडवू शकतो.

सकारात्मक राहा आणि तुमच्यासमोर काही अडचण उत्पन्न झाली तर....चालत राहा!

रिक हॅन्सन